वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बीड शहराचे वाटोळे करणाऱ्यांच्या हाती आपण पुन्हा नगर पालिकेची सत्ता देणार का?

# ना कमळ, ना तुतारी, चलू द्या राष्ट्रवादी काँग्रेस-शिवसेना, शिवसंग्राम-समाजवादी पार्टीच्या घड्याळची आघाडी



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## बीड शहराच्या विकासासाठी राज्य शासनाने हजारो करोडोंचा निधी दिला,पण शहराला भकास करणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवा

## अमृत जल योजना, भुयारी गटार योजनेतून पैसे खावून योजनेचा बट्ट्याबोळ करणाऱ्यांना २ डिसेंबरला चांगलाच धडा शिकवा

### विकासाला मुठ माती देत आलेला निधी लुटून घरी नेणाऱ्यांना आता कायमचेच घरी बसवा

## बीडकरांनो, शहराची झालेली दयनीय अवस्था पाहून लाज वाटते पण या सत्ताधाऱ्यांना कोणतीच लाज नाही

# बीडमध्ये नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत प्रेमलता पारवेंचा होणार विक्रमी मताने विजयी होण्याचे चिन्ह

## ना एमआयएम चालणार, ना भाजपा चालणार, चालणार ते फक्त घड्याळची टिक... टिक...

बीड, (दिव्य न्युज):- २ तारखेला होणाऱ्या मतदानासाठी आता सर्वांनीच गंबर कसली असून प्रचारात सर्वच पक्षांनी आघाडी घेतली आहे. दोन दिवसापुर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम, समाजवाटी पार्टी या आघाडीचे अधिकृत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार असलेल्या प्रेमलताताई पारवे व नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ मोठी प्रचार सभा केली. या प्रचार सभेत त्यांनी मागच्या सत्ताधाऱ्यांची मोठी चिरफाड केली. ३५ वर्षापासून सत्ता तुमच्या हातात होती. करोडो रूपयांचा विकास निधी बीडच्या विकासासाठी दिला होत. तुम्ही कोणता विकास केला हा तर बीडचा भकास आहे.... तुम्ही माझ्या हाती बीडची सत्ता पाच वर्षासाठी द्या, विकास काय असतो ? ते तुम्हाला पुण्याच्या पिंपरी चिंचवड महानगर पालिका आणि बारामती नगर परिषदेच्या प्रमाणे टप्प्याने करून देतो असे आश्वासन त्यांनी मतदारांना दिले आणि हेच आश्वासन मतदारांना पटले म्हणुन सभा झाल्यापासून बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस घड्याळच्या उमेदवारांच्या विजयाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात वाटचाल सुरू झाली. पारवेताई ह्या संपादक शेख मुजीब यांच्या सासु

▸▸ पान २ वर

## क्षीरसागर मुक्ताचा नारा देणारे नवनाथ शिराळे युवराजांच्या मागे फिरू लागले



सध्या बीड नगर पालिकेची निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशातच भाजपात नवीन प्रवेश केलेले डॉ.योगेश क्षीरसागर हे भाजपाचा प्रचार आणि प्रसार करत आहेत, अशातच बीड जिल्हा हा क्षीरसागर मुक्त झाला पाहिजे अशी घोषणा करणारे नवनाथआण्णा शिराळे हे क्षीरसागर कुटूंबांच्याच पाठीशी असल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपुर्वीच त्यांचे पत्रक हे क्षीरसागर मुक्त बीड करण्याचे होते आणि आज तेच डॉ.योगेश क्षीरसागर यांचा प्रचार आणि प्रसार करत आहेत. या बद्दल बीड शहरवासियांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. नवनाथ शिराळे यांनी त्यांची भुमिका स्पष्ट करण्याची मागणी सध्या बीड शहरवासियात होत आहे.

### पंकजाताईनी बीडमध्ये भाजपाची ताकड वाढवली

## आजच्या दौऱ्यात डॉ.घुंबरेसह भाजप पदाधिकाऱ्यांना निवडून देण्याचे आवाहन





बीड (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या प्रचार मोहिमेला चांगलाच वेग आला असून भाजपच्या अधिकृत उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुमरे यांच्या प्रचारासाठी भाजप नेत्या, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा आज (दि.२६) बीड शहरातील विविध भागात व्यापक प्रचार दौरा आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या दौऱ्यामुळे बीडच्या भाजपची ताकद वाढणार आहे. बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपकडून नगराध्यक्षपदाच्या

▸▸ पान २ वर

### जिल्हा प्रशासनाचा महत्वपुर्ण निर्णय

## युट्यूब, ऑनलाईन मिडियाला मतदान केंद्र अन् मतमोजणीत प्रवेश बंदी

बीड, (दिव्य न्युज):- कधी नव्हे तर या वेळेस जिल्हाधिकारी आणि नगर पालिका निवडणूक निर्णय अधिकार्यांनी महत्वाचा निर्णय घेतला असून ऐरे गैरे... नथ्थु खैरे..... पत्रकार म्हणुन मिरवणार्याला नगर पालिका निवडणूकीत मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्रात प्रवेश नाकारला असून यामध्ये युट्यूब चॅनल चालविणारे, ऑनलाईन दैनिक काढणारे, समाज माध्यम हाताळणार्या कोणत्याही प्रतिनिधीला नगर पालिका निवडणुकीच्या मतदान केंद्रावर आणि मतमोजणी केंद्रावर प्रवेश नाकारलेला आहे. ज्यांच्याकडे निवडणूक निर्णय अधिकार्यांनी

पान २ वर

## बाळासाहेब गुंजाळ यांना हक्काचा नगरसेवक म्हणून निवडून देण्याचा मतदारांचा निर्धार

### प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद ; कॉर्नर सभा, बैठकांवर जोर



बीड (दिव्य न्युज):- बीड नगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २१ ब मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे गट, शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार धर्मराज उर्फ बाळासाहेब गुंजाळ यांनी केलेला विकास, लोकांसाठी केलेली मदत हा मतदारांच्या चर्चेचा विषय ठरत आहेत. स्थानिक स्तरावर त्यांच्या कामकाजाची पद्धत आणि सर्वच जाती धर्मातील नागरिकांशी असलेला संवाद, सलोख्याचे संबंध यामुळे त्यांचा प्रभाव वाढू लागला आहे. त्यांच्या कॉर्नर सभा आणि बैठकांना देखील उत्स्फूर्त प्रतिसाद

▸▸ पान २ वर

## एमआयएमच्या प्रचारार्थ खा. इम्तियाज जलील यांची जाहिर सभा

### उपस्थित राहण्याचे ॲड. शफिकभाऊ यांचे आवाहन

बीड (दिव्य न्युज):- ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाच्या बीड शहर नगराध्यक्षा पदाच्या उमेदवार सुरेखा शृंगारे तसेच नगरसेवक उमेदवार यांच्या प्रचारार्थ पक्षाचे प्रदेश अध्यक्ष तथा मा खा इम्तियाज जलील साहेब यांच्या नेतृत्वाखाली आज (ता. ) शहरात मक्का चौक मोमीनपुरा येथे प्रचारसभांचे आयोजन करण्यात आले आहे.पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा हैदराबादचे खासदार बॅरिस्टर असदुद्दीन ओवेसी सहाब






प्रदेश अध्यक्ष तथा मा खा इम्तियाज जलील साहेब यांची सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या सभेचे आयोजन

▸▸ पान २ वर

# सोळंके मोठे आहेत पण खोटे आहेत-बाबुराव पोटभरे

## दोन्ही मुलाची शपथ घेऊन सांगा मी टक्केवारी खात नाही; लबाड लांडगं ढोंग करतंय



**माजलगाव, (दिव्य न्युज):- माजलगाव नगरपालिकेचा निवडणुक चांगलीच रंगात आली आहे. प्रभाग क्र.२ चे उमेदवारासाठी रात्री ७ वा. दि.२३ रविवार रोजी झालेल्या कॉर्नर बैठकीत आरोप प्रत्यारोपामुळं चांगलीच रंगात आली आहे. यावेळी मोहन जगताप, बाबुराव पोटभरे, सहाल चाऊस, विशाभर थावरे, मिलिंद आवाड, तालेब चाऊस, सुनील शिंदे, यादव, जावळे व इतर उवस्थित होते. यावेळी बाबुराव पोटभरे म्हणाले कि, आ.सोळंके हे मोठे आहेत पण खोटे आहेत, म्हणुन त्यांचे विषयी लबाड लांडगं ढोंग करतंय असे म्हणले तर काही वावगं होणार नाही.**

माजलगाव नगरपालिका व त्याचा पुर्ण कारभार हा त्यांचेच अधिकारात होता. त्यांना या कारभाराबाबत पुर्ण माहिती असूनही ते सोंग करत आहेत.मतदार संघातील कोणतेही कामे असोत त्या कामात त्यांचे कमिशन ठरलेले आहे. मग जनतेला भुलथापा देतात. मोहन जगताप म्हणाले कि, शहरातील प्रत्येक नगरसेवकाकडून सतरा टक्के कमिशन खाणाऱ्याना घरचा रस्ता दाखवा या नगरांचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर तुतारीला मतदान करा. सहाल चाऊस म्हणाले कि,आ.सोळंकेनि फॉर्म भरण्यासाठी त्रास दिला. तहसील मध्ये दोन तास बसुनही त्यांचा मतीतार्थ पुर्ण झाला नाही.आमचे अर्ज फेटाळणे साठी पदाचा दबाव आणत होते. मिलिंद आवाड म्हणाले कि, शहरातील असे कामे करा कि, उद्या रात्यावरून जाताना एखाद्या व्यक्तीचा फोन सहाल भैया यांना फोन आला तर तो रस्ता ताबडतोब पुर्ण झाला पाहिजे, शहरातील पाण्याबाबत तालेब चाऊसला फोन आला तर ते पुर्ण काम झाले पाहिजे,तसेच कचऱ्याबाबत यादव ला फोन आला तर तो कचरा लागलीच मार्ग निघाला पाहिजे,या प्रभागात एखाद कुत्र मेल अन नागरिकांचा फोन आला कि येथे लई वास येतो तर सचिन जावळे यांनी ते कुत्र उचलण्याची तरतूद केली पाहिजे, असा सल्ला त्यांनी या उमेदवारांना दिला. यावेळी मोहन जगताप, बाबुराव पोटभरे, सहाल चाऊस, नारायणराब डक, विशाभर थावरे, मिलिंद आवाड, तालेब चाऊस, सुनील शिंदे व इतर हजर होते.

# गुटखा घेवून जाणारी क्रिस्टा कार पकडली



बीड (दिव्य न्युज):- बर्दापुर येथुन अंबाजोगाईकडे येणाऱ्या ईनोव्हा कारमध्ये गुटखा असल्याची माहिती पोलिसांना मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत ५ लाख २६ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल बुधवार (दि.२६) रोजी पहाटे ५ वाजता जप्त केला.

सविस्तर माहिती अशी की, बर्दापुर येथुन अंबाजोगाईकडे गुटखा भरून एक पांढऱ्या रंगाची ईनोव्हा क्रिस्टा कार येत असल्याचे सांगितले. मिळालेल्या माहितीवरून सेलुअंबा रोडवर असलेल्या टोल नाक्यावर पांढऱ्या रंगाची ईनोव्हा क्रिस्टा कार जिचा नंबर एमएच १४ जीयु ०६९९ असा होता तिला थांबविण्यात आले व चालकास माहिती विचारण्यात आली. चालक फारोख हमीद सय्यद (वय ४५ रा. सय्यद गल्ली माजलगाव) याने माहिती दिली. यावेळी वाहनाची झडती घेतली असता ५ लाख २६ हजार २०० रूपयाचा गुटखा व इनोव्हा क्रिस्टा कार असा एकुण २५ लाख २६ हजार २०० रूपयाचा मुद्देमाल बुधवार (दि.२६) रोजी पहाटे ५ वाजता जप्त करण्यात आला. सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे केकाण, गित्ते, पोना भताणे, पो अं अंधळे आदींनी केली.

# गेवराई नगर पालिका निवडणुकीतील राष्ट्रवादीच्या उमेदवार दुरदाना बेगम फारुकी यांचे निधन

गेवराई (दिव्य न्युज):- गेवराई नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रभाग क्रमांक ११ 'अ' च्या अधिकृत उमेदवार दुरदाना बेगम सलीमोद्दीन फारुकी यांचे बुधवारी (दि.२६) सकाळी निधन झाले. ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत ही घटना घडल्याने शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



पक्षाकडून अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा झाल्यानंतर निवडणूक तयारीच्या पार्श्वभूमीवर त्या कार्यकर्त्यांशी समन्वय साधत होत्या. परंतु अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकस्मात निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

त्यांच्या निधनानंतर निवडणूक प्रक्रियेवर काय परिणाम होणार याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. निवडणूक विभागाच्या वतीने लवकरच अधिकृत भूमिका स्पष्ट केली जाण्याची शक्यता असून निवडणूक आयोगाला मार्गदर्शन मागितले असल्याचे नायब तहसीलदार संजय सोनवणे यांनी सांगितले. फारुकी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून विविध राजकीय, सामाजिक व्यक्तींनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

# अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेल्या महिला पोलिसांवर महिलांचा हल्ला : चौघींविरुद्ध गुन्हा दाखल

केज, (दिव्य न्युज):- :- सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतातील अतिक्रमण हटवून ताबा देण्याची कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिस पथकातील महिला पोलिसांवर चार महिलांनी हल्ला केला आहे. या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील टाकळी रोड लगत असलेल्या सर्व्हे नंबर ३७१ मधील वसीम साबेर कुरेशी यांच्या मालकी हक्कातील जमीनीवरील अतिक्रमण हटवून त्याचा ताबा देण्या संदर्भात वसीम कुरेशी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांना सशुल्क पोलीस बंदोबस्ताची मागणी केली होती.त्या नुसार दि. २१ नोव्हेंबर रोजी सिंधूबाई कदम यांना त्यांनी केलेले अतिक्रमण काढून घेण्या संदर्भात नोटीस बजावली होती. दि. २४ नोव्हेंबर रोजी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशाने पोलिस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण, पोलिस हवालदार फुलचंद सानप, महिला पोलिस पूजा माके, महिला पोलीस भाग्यश्री भालेराव यांचेसह मंडळ अधिकारी दयानंद मस्के, मंडळ अधिकारी नितीन भालेराव यांच्यासह गेले होते.

यावेळी वसीम कुरेशी यांच्या मालकी हक्कातील सर्व्हे नंबर ३७१ मधील ७ गुंठे मध्ये सिंधू कदम यांनी केलेले अतिक्रमण हटविण्यासंदर्भात पथक कारवाई करीत असताना त्यांना सदरचे अतिक्रमण तुम्ही आतापर्यंत का हाटविले नाही? असे विचारले असता सिंधू कदम यांनी आरडा ओरड करण्यास सुरुवात केली. त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिची मुलगी मिराबाई लक्ष्मण देटे व नातेवाईक भाग्यश्री रामेश्वर गायकवाड, रुक्मीनी गोपाळ फावडे हे आले. त्यांनी आल्या नंतर त्या सर्वांनी कर्तव्यावरील महिला पोलीस अंमलदार यांच्या अंगाशी झोंबाझोंबी करू लागले. तसेच आरडा ओरड करून गोंधळ सुरू केला. त्यांना समजावण्याचा प्रयत्न करीत असतांना सिंधुबाई कदम ही महिला पोलीस अंमलदार यांचे अंगावर दगड घेऊन धाऊन गेली.

# अजित पवारांच्या ताफ्यातील गाडीने उडवले; उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू

धारूर, (दिव्य न्युज):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्निशामक दलाच्या गाडीने दिलेल्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या कुसुम विष्णु सुदे (वय ३०) यांनी अखेर आज, मंगळवारी ( दि. २५ ) उपचारादरम्यान प्राण गमावले. यामुळे सुदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार (ता.२२) रोजी परतूरहून औसा येथे प्रचारसभेसाठी जात असताना तेलगाव-धारूर महामार्गावरील धूनकवड फाटा येथे ही दुर्घटना घडली होती. यात सुदे पती-पत्नी आणि त्यांच्या दोन मुली गंभीर जखमी झाल्या आहेत.

ताफ्यातील वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत कुसुम सुदे, त्यांचे पती विष्णु दामोदर सुदे (३५) आणि दोन लहान मुली रागिणी (९) व अक्षरा (६) गंभीर जखमी झाले होते. झालेला अपघात इतका भीषण होता की दुचाकी संपूर्ण उद्ध्वस्त झाली आणि चारही जण रस्त्यावर फेकले गेले. तातडीने स्थानिकांनी तत्परता दाखवत जखमींना धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तत्काळ लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. कुसुम सुदे यांची स्थिती अत्यंत नाजूक होती. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु गंभीर दुखापतींमुळे उपचार सुरू असतानाच त्यांची आज, मंगळवारी सकाळी प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनाने सुदे कुटुंबात तसेच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.दोन निष्पाप मुलींसह संपूर्ण कुटुंब एका क्षणात उद्ध्वस्त झाल्याने स्थानिक नागरिकांनी या अपघाताची चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, जखमी विष्णु सुदे व दोन्ही मुलींवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी अशी प्राथना व्यक्त केली जात आहे. या हृदयद्रावक घटनेने ताफ्यातील वाहनांच्या वेग आणि सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

# कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यु

कडा , (दिव्य न्युज):- काम आवरून घरी जात असताना पैठण ते बारामती रोडवरील देवीनिमगाव येथील पवणे वस्तीवर कंटनेच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यु झाल्याची घटना सोमवारी रात्री आठच्या दरम्यान घडली. संदिप विश्वनाथ अनारसे वय वर्ष ४० असे मृताचे नाव आहे.

आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील संदिप अनारसे हा तरूण सोमवारी रात्री आठच्या दरम्यान कड्यावरून घराकडे दुचाकीवरून जात असताना धामणगांव वरून कड्याकडे येत असलेल्या एका मालवाहतूक कंटनेरसोबत समोरासमोर धडक झाली. या अपघातात संदिप गंभीर जखमी झाला. उपचारासाठी अहिल्यानगर येथे घेऊन जात असताना त्याचा रस्त्यातच मृत्यु झाला. अंभोरा पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके,तुषार मिसळे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. मृतदेहावर कडा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. पश्चात आई-वडिल,पत्नी,दोन मुल,भाऊ असा परिवार आहे.

पान १ वरून

## ना कमळ, ना तुतारी

आहेत पण त्यांनी आज एका युट्यूब चॅनलला मुलाखत देताना म्हंटले की माझ्या सासू नव्हे तर माझ्या आई आहेत असे भावनीक उदगार त्यांनी काढले. विनाकारण कोणही उटसुट बिनबुटाचे आरोप कोणीही करू नये विरोधकांच्या पायाखालची वाळू आता सरकू लागल्याने आणि आपला पराजय डोळ्यासमोर दिसून येत असल्याने बिनबुडाचे आरोप ते करत असल्याने पण मतदारांवर याचा कोणताच परिणाम होत असल्याचे दिसून येत नाही. ज्यांनी ३५ वर्षा सत्ता केली आणि सत्ता भोगली, करोडो रूपयांच्या निधीवर हात साफ करून बीडला भकास करून सोडले असल्या लोकांवर आता बीडचे मतदार विश्वास करायला तयार नाही येणाऱ्या २ तारखेला घड्याळ या चिन्हासमोरील बटण दाबण्याचा निश्चय बीडच्या मतदारांनी केला असून बीडची नगर पालिका ही क्षीरसागर मुक्त झाल्याशिवाय बीडकर आता स्वस्त बसणार नाही अशी काहीशी स्थिती आता बीड शहरात दिसून येत आहे.

## आजच्या दौऱ्यात

अधिकृत उमेदवार म्हणून डॉ.ज्योती रविंद्र घुमरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या प्रचारासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचा आज दिवसभर प्रचार दौरा होणार आहे. या दौऱ्यात डॉ. घुमरे यांच्यासह भाजपचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्याअंतर्गत शहरातील विविध प्रभाग व प्रमुख ठिकाणी नागरिकांशी थेट संवाद, कॉर्नर सभा व बैठका घेण्यात येणार असून भाजपच्या विकासात्मक कार्यांचा आढावा घेत मतदारांना मतदानाचे आवाहन करण्यात येणार आहे. या दौऱ्यात ठिकठिकाणी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे.

असे आहे प्रचार दौऱ्याचे वेळापत्रक

१) दुपारी १२.३० ते १.३० स्थळ - आप्पा जगताप यांच्या निवासस्थानी आगमन व भोजन, चाणक्यपुरी नगर, २) दुपारी १.३० ते ३.०० स्थळ - वकील/डॉक्टर बैठक, हॉटेल निलकमल (नगर रोड) ३) दुपारी ३.०० ते सायं. ५.०० राखीव, ४) सायं. ५.०० ते ६.०० स्थळ - चंद्रकांत सुळे भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ बैठक, स्वा. सावरकर कॉलेज, फुलेलाई नगर, बीड, ५) सायं. ६.०० ते रात्री ८.०० स्थळ - पालवन चौक सभा, वॉर्ड १३-१४ साठी. ६) रात्री ८.०० ते ९.०० स्थळ - जगदीश फुलचंद गुरसुळे व भाग्यश्री सागर देशपांडे यांच्या प्रचारार्थ सभा, धोंडीपुरा असे दौऱ्याचे नियोजन आहे.

## बाळासाहेब गुंजाळ यांना

मिळू लागला आहे.

बाळासाहेब गुंजाळ यांनी गेल्या काही वर्षांत प्रभागातील मूलभूत सुविधा सुधारण्यावर भर दिलेला आहे. रस्ते दुरुस्ती, पाईप लाईन दुरुस्ती, पाणीपुरवठ्याची सुधारणा, नाल्यांची स्वच्छता, तसेच स्ट्रीट लाईटची कामे करून घेणे अशा वैयक्तिक आणि प्रभागस्तरावर परिणाम करणाऱ्या कामांना प्राधान्य दिल्याने त्यांच्याबद्दल मतदारांमध्ये सकारात्मकता निर्माण झाली आहे. याशिवाय, कोणत्याही समस्येसाठी सहज उपलब्ध राहणे, तातडीने प्रतिसाद देणे आणि दिवसभर प्रभागात फिरून नागरिकांशी थेट संवाद साधणे हा त्यांच्या कामाचा भाग असल्यामुळे बाळासाहेब गुंजाळ हे हक्काचे नगरसेवक म्हणून ओळखले जात आहेत. आधी केलेल्या कामांचे प्रत्यक्ष फायदे मतदारांना अनुभवायला मिळत असल्याने त्यांना जनतेचा पाठिंबा मिळू लागला आहे. प्रत्येक समस्या स्वतः पाहून घेणे आणि तत्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न ही त्यांची मजबूत बाजू मानली जाते. मतदारांच्या विविध घटकांमध्ये चांगली संघटन जोडणी, युवक, महिलावर्ग आणि ज्येष्ठ मतदारांमध्ये संवाद वाढवल्याने त्यांचा प्रचार सर्वसमावेशक होत आहे. स्वच्छ प्रतिमा आणि सरळ साधेपणा, राजकारणात असूनही जमिनीवरचा नेता अशी बाळासाहेब गुंजाळ यांची ओळख आहे. त्यामुळेच बाळासाहेब गुंजाळ यांच्या माध्यमातून हक्काचा माणूस म्हणून त्यांनाच निवडून देण्याचा निर्धार नागरिकांनी केला आहे.

## एमआयएमच्या प्रचारार्थ

आज रात्री ७.३० वाजता मक्का चौक मोमीनपुरा येथे होणार आहे तरी मोठ्या संख्येने .एमआयएमचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, असा विश्वास पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला आहे. सुरेखा शृंगारे यांना विजयी करण्याचे आवाहन या सभांमधून करण्यात येणार आहे.एमआयएमच्या या दणकेबाज प्रचाराने बीड शहरातील निवडणूक वातावरण अधिकच तापले आहे.

## युट्यूब, ऑनलाईन

दिलेल्या प्रवेशिका आहेत त्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे.सध्या होत असलेल्या नगर पालिका निवडणूकीत बीड जिल्हाधिकार्यांनी मिडियासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात होत असलेल्या सहा नगर पालिका निवडणूकीचे वार्ताकन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जिल्हा माहिती विभागामार्फत प्रसिध्द केलेल्या निर्णयात म्हंटले आहे की, यादीवर असलेल्या आणि प्रत्येक दिवशी निगत असलेल्या दैनिकांच्या प्रतिनिधीनीच मतदान केंद्र आणि मतमोजणी केंद्रात प्रवेश करण्यासाठी संपादकाच्या शिफारशीसह छायाचित्रे मागविलेले आहेत. त्यात खाली टिपद्वारे युट्यूब चॅनल चालवणारे, ऑनलाईन दैनिक काढणारे, बातमीची लिंक टाकणारे, सोशल मिडीया सांभाळणारे यांना कोणलाही मतदान केंद्रावर आणि मतमोजणी केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही असा निर्णय ही जिल्हाधिकार्यांने घेतला आहे. त्यामुळे पत्रकार म्हणुन मिरवणारे ऐरे गैरे.... नथ्थु खैरे.... यांची मोठी अडचण झाली आहे.